# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) पंचायत समितीच्या नवीन इमारतीचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१) ४४ (११-०४-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) पंचायत समितीची जुनी प्रशासकीय इमारत जमिनदोस्त करून "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्त्वावर सन २०१० साली सुरू केलेल्या नवीन इमारतीचे काम अद्यापही अपुर्णावस्थेत असल्यामुळे प्रशासकीय काम करताना कर्मचारी व नागरीकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या नुतनीकरणासंदर्भात विकासकाशी झालेल्या करारानुसार विकासकाने सदर इमारतीतील व्यावसायिक गाळे विक्री करून नंतर प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण करण्याचे ठरवले असताना विकासकाने व्यावसायिक गाळे व प्रशासकीय इमारतीचे काम एकत्रीत हाती घेतल्यामुळे इमारतीचे काम पूर्ण होवू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ८ कोटी रूपये खर्च करून काम सुरू झाल्यानंतर जवळपास २ वर्षात उभारलेल्या पनवेल पंचायत समितीच्या इमारतीतील व्यावसायिक गाळे न विकल्यामुळे विकासकाने इमारतीचे काम बंद केल्यामुळे इमारत अपुर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल पंचायत समितीची प्रशासकीय इमारतीच्या कामात हलगर्जीपणा करणा-या संबंधित विभागाच्या अधिकारी व विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

विकासकाने पनवेल पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे ६७ % जागेवर बांधकाम सुरू केलेले आहे. तथापि, विकासकाला वाणिज्य संकुलासाठी देण्यात आलेली उर्वरित ३३ % जागेत झोपडपट्टीमुळे व तालुका लघु पशुवैद्यकिय सर्व चिकित्सालय विभागाची अस्तित्वात असलेली इमारतीची जागा उपलब्ध न झाल्याने सदर जागेत कामाची सुरूवात केलेली नाही. सदरची जागा उपलब्ध करून घेण्याबाबत संबंधितांकडे पाठपुरावा सुरू आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) सदर भुखंड विकसित करण्याच्या कामाचा नियमित आढावा घेणेसाठी प्रारूप निविदेतील भाग-१ मधील कलम ७ अन्वये, मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती गठित करण्यात आलेली आहे. पनवेल पंचायत समितीचे प्रलंबित असलेले काम सुरु करणेसाठी व विकासकास काम करणेबाबत येणाऱ्या अडथळयांबाबत सुकाणू समितीची बैठक घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जैतापुर (ता.राजापूर जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासह उपकेंद्रात अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(२) ८०० (०९-०४-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जैतापुर (ता.राजापूर जि.रत्नागिरी) येथील बहुचर्चित प्राथमिक आरोग्य केंद्र व त्या अखत्यारितील ६ उपकेंद्रात मागील अनेक वर्षापासून तब्बल १० महत्वाच्या कर्मचारी वर्गाच्या रिक्त पदामुळे त्या परिसरातील गोरगरीब ग्रामीण जनतेस औषधोपचारापासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जैतापुर प्राथमिक आरोग्य केंद्रात २ वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता असताना येथे केवळ एकच वैद्यकीय अधिकारी रुजू झालेला असून दुसरा वैद्यकीय अधिकारी अद्यापी रुजूच झालेला नाही, शिवाय या आरोग्य केंद्रात आरोग्य सहाय्यक आणि औषध निर्माण अधिकारी (फार्मासिस्टच) ही महत्वाची पदे रिक्त आहेत इतकेच नव्हे तर डोंगर, जानशी, जानशी पडवे डोंगरजानशी आदी उपकेंद्रातील कर्मचा-यांच्या जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-११-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) नाही.

ग्रामीण जनतेस औषधोपचारापासून वंचित रहावे लागू नये म्हणून उपलब्ध कर्मचा-यास रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार देवून, कामकाज चालवले जात आहे.

(३)राज्यातील सर्व जिल्हा परिषदांकडील रिक्त पदे भरण्याकरीता माहे मार्च, २०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी कक्षाकडून जाहीरात प्रसिध्द करून उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. तथापी, सदयस्थितीत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेकडील पदे भरण्याची कार्यवाही वित्त विभागाच्या दि.०४/०५/२०२०च्या आदेशानूसार प्रलंबित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय रुग्णालयात सर्पदंशावर वेळेत उपचार मिळण्याबाबत**

**(३) ११७५ (१३-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयात सर्पदंशावर उपचारासाठी औषधांसह सर्व सुविधा पुरविण्यात आलेल्या असल्या तरीसुध्दा रुग्णांना मात्र वेळेत उपचार मिळत नसल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना मांत्रिकांचा आधार घ्यावा लागत असल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयात १२३६ जणांना सर्पदंश झाला असून त्यापैकी १५ रुग्णाचा मृत्यु झाला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्पदंश रुग्णावर वेळेवर उपचार मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२६-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

रायगड जिल्हयातील आरोग्य संस्थांमार्फत एकूण ३८९० सर्पदंश रुग्णांची नोंद असून त्यापैकी ९ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे.

(३) राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये Anti Snake venom serom १० ml एकूण २०२१५७ व्हायल्स एवढा लसीचा साठा उपलब्ध आहे. तसेच आपत्कालिन रुग्णवाहिकांमध्येही नजिकच्या आरोग्य संस्थेमधून सर्पदंश लस उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कै.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यातील कार्यालयाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४) १३८० (११-०४-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कै. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत राज्यभरात ग्रामपंचायत कार्यालय उभारणीकरिता मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत सांगली जिल्हयातील किती ग्रामपंचायती कार्यालयास मंजुरी मिळाली व किती ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे व किती कामे अपूर्णावस्थेत आहेत,

(३) असल्यास, सदरची कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त कामे तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालय इमारत बांधण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना सुरू करण्यात आलेली आहे.

(२) व (३) मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यातील एकुण १९ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी १३ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामास जिल्हा परिषद स्तरावरून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ग्रामपंचायतींपैकी ९ ग्रामपंचायतींची कामे निविदास्तरावर असून २ कामे सुरू झालेली आहेत. सदर १३ ग्रामपंचायतींनी अंदाजपत्रक जादा रकमेचे तयार केल्यामुळे त्यांना कमी रकमेचे अंदाजपत्रक फेरसादर करावे लागल्यामुळे सदर कामांस उशीर झालेला आहे. शासन स्तरावरून मान्यता दिलेल्या उर्वरित ६ ग्रामपंचायतींपैकी १ ग्रामपंचायतीचे बांधकाम अन्य योजनेतून मंजूर आहे, २ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामाच्या जागेचा प्रश्न आहे, २ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामाच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे व १ ग्रामपंचायत सांगली जिल्ह्यात नाही.

(४) व (५) मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत शासन निर्णयातील तरतूदीनुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर कामाचा दरमहा आढावा घेणे अपेक्षित आहे. त्यानुसार, सांगली जिल्ह्यातील पात्र ग्रामपंचायतींचे इमारत बांधकाम पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी संबंधितांना सक्त सूचना दिलेल्या असून जिल्हा परिषदेमार्फत कामांचा दरमहा आढावा घेण्यात येत आहे.

---

### मोताळा (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयात औषधांचा पुरवठा करणेबाबत

**(५) १४३० (१३-०४-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि.बुलढाणा) ग्रामीण रुग्णालयात औषध साठयाच्या कमतरतेमुळे रुग्णांना खाजगी औषधालयाचा आधार घ्यावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने या ग्रामीण रुग्णालयात तात्काळ औषधांचा पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२६-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

मोताळा (जि.बुलढाणा) ग्रामीण रुग्णालयात जीवरक्षक, अत्यावश्यक व इतर पूरक औषधे तसेच साहित्यांचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. जी औषधे औषधी भांडारात उपलब्ध नाहीत, ती औषधे स्थानिक स्तरावरुन खरेदी करुन रुग्णास निशुल्क उपलब्ध करुन दिली जातात.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खानापूर, आटपाडी, तासगांव व कडेगांव (जि.सांगली) तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(६) १५५४ (१३-०४-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी, तासगांव व कडेगांव (जि.सांगली) तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) होय.

(२) कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती, मयत, पदोन्नती तसेच आरोग्य संस्थेमध्ये जादा मनुष्यबळ निर्मिती झाल्याने रिक्त पदांची संख्या अधिक असल्याचे दिसून येते.

(३) सद्यस्थितीत राज्यातील सर्व जिल्हा परिषदेतील पदभरतीसाठी शासनाच्या महाआयटी कडून अर्ज मागविण्यची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तथापि, सद्यस्थितीत कोरोनाच्या पार्श्वभुमीवर वित्त विभागाच्या दिनांक ०४ मे, २०२० च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेकडील पदभरतीची कार्यवाही प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय सेवेतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७) १५५७ (११-०४-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय सेवेतील रिक्त पदे तात्काळ भरण्याचे आश्वासन राज्य शासनाने दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती विभागातील किती पदे रिक्त आहेत,

(३) असल्यास, सदरील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०४-११-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे. रिक्त पदांचा आढावा घेऊन ६० ते ७० हजार पदांसाठी टप्प्याटप्प्याने भरती केली जाणार असल्याची घोषणा जानेवारी २०२० मध्ये केली होती. तथापि, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अर्थव्यवस्थेवरील परिणाम व वित्तीय उपाययोजनांतर्गत नविन पदभरतीवर तात्पुरत्या कालावधीसाठी निर्बंध घातले आहेत.

(२) सन २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासनाचे विविध विभागामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या एकूण ७,३५,६०९ पदांपैकी अंदाजे १,५४,८२९ पदे रिक्त होती.

(३) व (४) प्रश्न भाग १ प्रमाणे.

---

**कोकण विभागात पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेली रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(८) १८०९ (१५-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात प्रस्तुत पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामे ही संबंधित कंत्राटदाराने निविदा रक्कमेच्या विशिष्ट

टक्केवारीची रक्कम न दिल्यास त्याची निविदा व कामात उणीवा दाखविल्या जातात अशी तक्रार कंत्राटदाराने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीमध्ये रायगड जिल्हयातील अलिबाग, रोहा व तळा येथील अधिकाऱ्यांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कोकणात सरफळेवाडी ते वडाचीवाडी, खेड तालुक्यातील बेरळ-बोरज-कोंडिवली व पेण तालुक्यातील बोरगाव ते धनगरमाळ तसेच कोकण विभागात करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामाचे आयुष्य पाच वर्षे असूनही अधिका-यांशी संगनमत करुन अनेक कंत्राटदार निकृष्ट कामे करुन अशा पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील अनेक केलेली कामे ही अतिशय निकृष्ट दर्जाची आणि बोगस कामे करून कोट्यवधी रूपये लाटले असून सदर कामांचे मेजरमेंट बुक तपासून त्रयस्थ संस्थेमार्फत किंबहूना उच्च स्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील दापोली सर्कलमध्ये येणा-या खेड तालुक्यातील बेरळ-बोरज- कोंडिवली या ११ किमी रस्त्यांचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत करण्यात आले असून या कामाची तपासणी न करता सात कोटीचे देयक देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे होऊन त्याचा बराचसा भाग पावसाळ्यात वाहून गेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत चौकशी करुन या प्रकरणात दोषी आढळणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-११-२०२०) :** (१), (२) व (३) याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारींबाबत चौकशी करण्यात आली असून तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आले.

सदर कामांची SQM व SSQM यांनी गुणवत्ता तपासणी केली असून त्यांनी कामास कोणताही प्रतिकूल शेरा दिलेला नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) हे खरे नाही.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चतारी ग्रामीण रुग्णालय (ता.पातुर, जि.अकोला) येथील रुग्णांसाठी सिकलसेल व एचआयव्ही तपासणीकरीता शिबिर राबविण्याबाबत

**(९) १८१६ (२५-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) चतारी ग्रामीण रुग्णालय (ता.पातुर, जि.अकोला) येथे गेल्या आठवडयात घेण्यात आलेल्या सिकलसेल सप्ताह व एचआयव्ही तपासणी कागदावर दाखविण्यात आल्याने या रुग्णालयांतर्गत येणा-या गावासह परिसरातील रुग्णांना कर्मचा-यांच्या मनमानी कारभारामुळे सिकलसेल तपासणी व एचआयव्ही तपासणीपासून वंचित ठेवण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनूसार शासनाच्या योजना व शिबिराबद्दल नागरिकांना जनजागृती करणे गरजेचे असूनही त्याकडे दुर्लक्ष करुन मनमानी कारभार करणा-या संबंधित कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र सरकारच्या दुर्मिळ आजार उपचार पद्धती राष्ट्रीय धोरण २०१७ नुसार राज्यात अशा प्रकारची योजना सुरु करणेबाबत

**(१०) १९८२ (१३-०४-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्मिळ आजार असलेल्या रुग्णांना औषध, विशेष आहार व हार्मोन्स पुरविणे याकरिता केंद्र सरकारच्या दुर्मिळ आजार उपचार पद्धती राष्ट्रीय धोरण २०१७ नुसार राज्यातही अशा प्रकारची योजना सुरु करण्याची गरज असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रत्येक जिल्हा रुग्णालये व प्रमुख रुग्णालयांना अशा प्रकारची दुर्मिळ आजार तपासणी व उपचार करण्याकरिता आवश्यक सेवा सुविधा पुरविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेकरिता शासनाने तत्काळ समिती नेमून अशा दुर्मिळ आजार असणाऱ्या रुग्णांना १५ लाख रुपयापर्यंतची मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १३.०१.२०२० रोजी दुर्मिळ आजार पध्दती राष्ट्रीय धोरणाचा मसुदा सर्व राज्यांचे अभिप्राय प्राप्त करण्यासाठी प्रसिध्द केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

निवडक उच्च दर्जाच्या तृतीय श्रेणीच उपचार करणाऱ्या मुख्य रुग्णालयात तपासणी व उपचार करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

(३) प्रस्तावित मसुद्यात गट-अ मधील दुर्मिळ आजारांसाठी एक वेळेच्या उपचारासाठी कमाल रु.१५.०० लक्ष राष्ट्रीय आरोग्य निधीतून देण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे.

(४) सर्व राज्ये व जनतेच्या सूचना विचारात घेऊन केंद्र शासन दुर्मिळ आजारांवरील उपचाराबाबतचे अंतिम धोरण जाहीर करणार आहे.

---

**पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अर्थ सहाय्य मिळणेबाबत**

**(११) २०७२ (१५-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात पंडित दीनदयाळ उपाध्याय योजने अंतर्गत लाखो पात्र अर्ज प्राप्त झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातून जिल्हा, तालुका निहाय किती पात्र अर्ज आलेले आहेत,

(३) असल्यास, अजूनपर्यंत पात्र ठरलेल्या अर्जापैकी कोणत्याही लाभार्थी यांना अर्थ साहाय्य करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अर्थ सहाय्य न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यभरातून जिल्हास्तरावर २८७० पात्र अर्ज प्राप्त झालेले असून सर्व पात्र लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) येथील पंचायत समिती इमारत बांधकामाच्या प्रस्तावास निधीसह मान्यता देणेबाबत**

**(१२) २११९ (१६-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) येथील पंचायत समिती इमारत शिकस्त झाली असून राहण्यायोग्य नसल्याचे तसेच प्रशासकीय कामकाज करण्याच्या दृष्टीने कमकुवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर्यापूर येथील पंचायत समिती इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर केला असून प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दर्यापूर (जि.अमरावती) येथील पंचायत समिती इमारत बांधकामाच्या प्रस्तावास निधीसह मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-११-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये, दर्यापूर पंचायत समिती, जि.अमरावती येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. परंतु, सदर प्रस्तावात काही त्रुटी असल्याने त्यांची पूर्तता करणेबाबत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. दर्यापूर पंचायत समिती, जि.अमरावती येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, संबंधित जिल्हा परिषदेकडून त्रुटींची पूर्तता केल्यानंतर, निधीच्या उपलब्धतेनुसार सदर प्रस्तावावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---

## हिंगोली जिल्हा ग्रामीण यंत्रणेसह विविध यंत्रणा मार्फत राबविण्यात येणा-या घरकुलांचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(१३) २१३१ (१५-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा ग्रामीण यंत्रणेसह विविध यंत्रणा मार्फत राबविण्यात येणा-या घरकुलांचे बांधकाम प्रलंबित असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात सन २०१६ ते २०१९ या काळात देण्यात आलेले घरकुलाचे उदिष्ट अद्याप पर्यंत पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे घरकुलाच्या प्रतिक्षेत असणा-या नागरीकास नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सन २०१६-१७ ते २०१८-१९ या कालावधीकरीता हिंगोली जिल्ह्यास केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनेंतर्गत एकूण १२४३४ एवढे उद्दीष्ट प्राप्त झाले होते. त्यापैकी ९११७ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ३३१७ घरकुले अपूर्ण आहेत. ३३१७ अपूर्ण घरकुलांपैकी २१०५ घरकुलांचे बांधकाम विविध टप्प्यांवर असून या प्रकरणी वेळोवेळी राज्य तसेच जिल्हास्तरावरुन पाठपुरवा करुन सदर अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याबातची कार्यवाही करण्यात येत आहे.

उर्वरित १२१२ लाभार्थ्यांच्या घरकुलांचे बांधकामे गावात जागा उपलब्ध नसणे, जमिनीचे दर जास्त असणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण, लाभार्थी तात्पुरते स्थालांतरण इत्यांदी विविध कारणांमुळे अद्यापपर्यन्त सुरु झाले नाहीत. सदर लाभार्थींना पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतंर्गत जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा तसेच तालुका स्तरावर पाठपुरवा करण्यात येत आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता उद्दीष्ट प्राप्त होतात. सदर प्राप्त उद्दीष्टे राज्य शासनाकडून जिल्हानिहाय व तालुकानिहाय वाटप करण्यात येतात. मागील वर्षाचे घरकुलांचे बांधकाम अपूर्ण असल्यामुळे प्राप्त उद्दीष्टांचे वाटप करण्यामध्ये कोणतीही अडचण येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंचायत समितीच्या (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) इमारतीचे पुनर्बांधणी करणेबाबत

**(१४) २२३४ (१२-०४-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथील इमारत अपुऱ्या जागेत व सोयीसुविधांचा अभाव असल्याचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीमध्ये पाणी, स्वच्छतागृह नसल्याने महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांची प्रचंड प्रमाणात गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समिती मलकापुर जिल्हा बुलढाणा ची शिकस्त झालेली इमारत व मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्याने नवीन इमारत मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०९-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत : खरे आहे.

(३) पंचायत समिती मलकापुर, जिल्हा बुलढाणा येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचे सन २०२०-२१ च्या दरसूचीवर आधारित सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम जिल्हा

परिषद स्तरावर प्रगतीपथावर आहे. पंचायत समिती मलकापुर, जिल्हा बुलढाणा येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर, निधीच्या उपलब्धतेनुसार सदर प्रस्तावावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) मध्यवर्ती हॉस्पिटल येथे आयुष कक्ष सुरु करणेबाबत**

**(१५) २३९६ (१३-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्टीय आयुष अभियान कार्यक्रम अंतर्गत ठाणे जिल्हयातील मध्यवर्ती हॉस्पटिल उल्हासनगर-३ येथे स्वतंत्र आयुष कक्ष स्थापन करावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सह संचालक, आयुष राट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांनी पत्र क्र.राआसो/आयुष/राआअ/अनुदान विनियोग/६३४४२-४८४ दिनांक २७ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास आयुष कक्षेसाठी निधी उपलब्ध असताना सुद्धा मध्यवर्ती हॉस्पिटल उल्हासनगर यांनी वारंवार मागणी करूनही आयुष कक्ष सुरु करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कक्ष सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर पत्र हे स्त्री रुग्णालय, उल्हासनगर यांना सुविधा निर्माण करण्यासाठी वितरीत केलेल्या अनुदानाबाबत आहे.
(३) हे खरे नाही.
तथापि, स्त्री रुग्णालय, उल्हासनगर येथे आयुष कक्ष स्थापन व कार्यरत आहे.
(४) व (५) कार्यवाही केल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १८ शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयात आहारतज्ज्ञांची पदे तातडीने भरण्याबाबत**

**(१६) २९१२ (२५-०३-२०२०). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर विभागातील शासकिय रूग्णालयातील मेडीकल रुग्णालय, मेयो, तसेच चंद्रपूर शासकिय महाविद्यालय व रूग्णालय, गोदिया, आकोला, यवतमाळ, येथील रूग्णालयात उपचार घेणा-या आंतररूग्ण रूग्णांना संतुलीत आहार उपलब्ध व्हावा याकरिता २०० खाटामागे एक आहार तज्ञाची नियुक्ती केली जात असताना शासकिय महाविद्यालयात एकच आहार तज्ञ उपलब्ध असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १८ शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयात आहारतज्ज्ञांची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०२-११-२०२०) :** (१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये मुंबई, पुणे, नागपूर व सोलापूर येथे १ पेक्षा जास्त आहारतज्ञांचे पदे मंजूर असून उर्वरीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये आहारतज्ञांची प्रत्येकी १ पद मंजूर आहे.

(२) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये आहारतज्ञांची मंजूर २८ पदांपैकी १८ पदे भरलेली व १० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याकरीता संचालनालयाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत राज्यात कंत्राटी पध्दतीने कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांना सेवेत कायम करणेबाबत**

**(१७) ३०५९ (२५-०३-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियान याअंतर्गत सन २००५-०६ पासून कंत्राटी पध्दतीवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर ११ महिन्यांनी या कर्मचाऱ्यांच्या सेवा खंडीत करुन ही पदे पुन्हा पुनरुज्जीवीत करण्यात येत असल्याने या कर्मचाऱ्यांना नियमिती सेवेचा लाभ व अन्य सोई सुविधा मिळत नसल्याच्या तक्रारी कर्मचारी संघटनेमार्फत शासनाकडे गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करणे, समान काम समान वेतन, एच आर पॉलिसी अंतर्गत इतर सुविधा व विमा संरक्षण या मागण्यांसदर्भात शासनाने सन २००५ मध्ये वा त्यादरम्यान एक समिती नियुक्त केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच दिल्ली, हिमाचल प्रदेश, गोवा, राजस्थान तसेच पंजाब ई. राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याच्या व अन्य सोई सुविधांसंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात आल्याबाबत शासनाने आढावा घेतला आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
संघटनेमार्फत शासनाकडे मागणी करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही, तथापि कार्यरत कर्मचाऱ्यांना नियमित स्वरुपात शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासन निर्णय दिनांक ५.६.२०१७ अन्वये अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान तथा आयुक्त आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती व तद्नंतर शासननिर्णय दिनांक ८.०५.२०१८ अन्वये मा.मंत्री (वित्त विभाग), मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) व मा.मंत्री (ग्राम विकास विभाग) अशी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन हा निर्णय लागू होत नसल्याबाबत केंद्र शासनाने दिनांक १३.०७.२०१७ च्या पत्रानुसार कळविले आहे. विमा संरक्षण लागू करण्याबाब व मानव संसाधान धोरणाबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) होय.
(५) समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील चासकमान डाव्या कालव्याचे अस्तरीकरण करणेबाबत**

**(१८) ४३५९ (१६-०४-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) पुणे जिल्हयातील शिरुर व खेड तालुक्याला वरदान ठरलेल्या चासकमान डावा कालवा १४४ किलोमिटर अंतराचा असून कालव्यामध्ये झाडेझुडपे व कॅनोल अस्तरीकरणाच्या अभावी आवर्तनाच्या वेळी लाखो लिटर पाणी वाया जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चासकमान कॅनोलमध्ये दगड माती पडून कॅनोलची रुंदी व खोली कमी झाली तसेच पोटच-या झाडाझुडपांनी व्यापल्या असून अनेकांनी पोटच-या गाडून टाकल्या, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पाणी सोडण्यापूर्वी कालव्याची तात्पुरती दुरुस्तीसुध्दा केली जात नसल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१८ मध्ये रेटवडी येथे कालव्याला गळती झाल्यामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरले तसेच कालव्यालगत सततच्या गळतीमुळे शेती नापीक झाल्या आहेत हे खरे आहे काय,
(५) असल्यास, चासकमान प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणासाठी तसेच अपूर्ण कामे पूर्ण करणेसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता नसल्याचे वारंवार सांगण्यात येते, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, चासकमान प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणासाठी तसेच अपूर्ण कामे पूर्ण करणेसाठी खास बाब म्हणून निधी उपलब्ध करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयंत पाटील (२८-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

अस्तरीकरणाअभावी व कालव्यावरील बांधकामांमधून पाण्याची गळती होत आहे.
(२) चासकमान प्रकल्प सद्य:स्थितीत बांधकामाधीन असून अद्याप संपूर्ण वितरण प्रणालीकरिता आवश्यक भूसंपादन झालेले नसल्यामुळे पुच्छ भागात काही ठिकाणी पोटचाऱ्या गाडून टाकल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(३) दरवर्षी पाखरण कार्यक्रमांतर्गत पाणी सोडण्यापूर्वी यांत्रिकी विभागाकडील उपलब्ध यंत्रसामग्रीद्वारे कालव्यातील गाळ, झाडे-झुडपे काढून आवश्यक ठिकाणी भरावाची दुरूस्ती करण्यात येते.
(४) दिनांक १७.०७.२०१८ पासून चासकमान डाव्या कालव्याचे खरीप आवर्तन सुरू असताना दिनांक ०६.०९.२०१८ रोजी रेटवडी गावाच्या जवळपासच्या ठिकाणी डाव्या कालव्यातून गळतीचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले होते. त्याठिकाणी शेतकऱ्यांची घरे कालव्याच्या पायथ्यास (Toe) लागून असल्यामुळे हे पाणी निचरा होत नसल्याने घरात अंशतः पाणी गेले होते. तथापि, सदर ठिकाणी दुरुस्तीचे काम करून घेण्यात आले असून पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने कालवा भरावाच्या पायथ्यालगत (Toe) निचरा चारी काढून कालव्याची दुरुस्ती केल्यामुळे शेतीचे नुकसान झालेले नाही.
(५) प्रकल्पास तृतीय सुप्रमा प्राप्त करून घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.
(६) चासकमान डावा कालवा किमी १ ते १४० मधील अस्तरीकरण करण्यासाठीची तरतूद तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावात अंतर्भूत आहे.

सध्यास्थितीत चासकमान डावा कालवा किमी १ ते १४४ मध्ये प्राधान्याने मोठ्या प्रमाणात गळती होत असलेल्या बांधकामांची दुरुस्ती व आवश्यकतेनुसार निवडक ठिकाणी अस्तरीकरण या गळती प्रतिबंधक उपाययोजना करावयाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगत असून ही कामे महामंडळ स्तरावर खास बाब म्हणून सिंचन तसेच पुनर्स्थापना निधीमधून करणे प्रस्तावित आहे.

---

## पुणे जिल्हयातील राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाने जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत

**(१९) ४३६८ (१२-०४-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील ३२९ पशुवैद्यकीय संस्थाद्वारे तांत्रीक सेवा पुरविल्या जातात त्यापैकी २८८ पशुवैद्यकीय संस्था जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असून उर्वरित १०१ संस्था राज्यस्तरावर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या निधीतून सदरहू योजना राबविण्यास अडचण निर्माण होत असल्याने सदरचे दवाखाने हे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करणेबाबतचा ठराव दिनांक २८ जून २०१९ रोजी सर्वसाधारण सभेमध्ये करुन जिल्हा परिषद, पुणे यांनी पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांच्याकडे शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुधनाला पशुवैद्यकीय सेवा तातडीने पुरविण्याच्या दृष्टीने शासनाचे पशुवैद्यकीय दवाखाने जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-११-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

तथापी, जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत पशु संवर्धन विभागामार्फत पुणे जिल्हयात श्रेणी-१चे १०० व श्रेणी-२चे १२७ अशा एकूण २२७ पशु वैद्यकिय संस्था असून एक फिरता पशु वैद्यकिय दवाखाना कार्यरत आहे.

तसेच, राज्य शासनांतर्गत जिल्हा पशुसंवर्धन चिकीत्सालय-१, तालुका लघु पशुसंवर्धन चिकित्सालय ५, श्रेणी-१ चे ८ व श्रेणी-२ चे ८१ अशा एकूण ९५ पशुसंवर्धन संस्था आहेत. पुणे जिल्हयात एकूण ३२२ पशुवैद्यकिय संस्थांमार्फत पशुपालकांना सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

(२) अंशत: खरे आहे.

(३) राज्यात सदयस्थितीत कार्यरत असलेल्या राज्यस्तरीय पशु वैद्यकिय दवाखान्यांकडून जिल्हा परिषद सेस योजना, जिल्हा वार्षिक योजना, राज्यस्तरीय योजना तसेच केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये कोणत्याही अडचणी दिसून आल्या नाहीत. त्यामुळे आयुक्त, पशु संवर्धन पुणे यांचेकडून दि.२९/०६/२०१७ रोजीच्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अद्याप पावेतो धोरणात्मक निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिवरवाडी (ता.शिराळा, जि.सांगली) येथील पाझर तलावांच्या निकृष्ट बांधकामाबाबत

**(२०) ४३९९ (१६-०४-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवरवाडी (ता.शिराळा, जि.सांगली) या डोंगरी भागात वसलेल्या गावातील पाणीटंचाई समस्या सोडविण्यासाठी पाटबंधारे विभागामार्फत पाझर तलावाचे बांधकाम करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर तलावाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे पुन्हा तलावाची गळती वाढल्याने तेथील ग्रामपंचायत, सरपंच व उपसरपंच व स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटून पाझर तलावाच्या कामाबाबत पुन्हा गत वर्षी दुसऱ्यांदा निधी मंजूर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुसऱ्यांदा देखील सदर पाझर तलावाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोन्ही वेळा करण्यात आलेल्या कामांच्या निविदा किती रक्कमेच्या होत्या व त्यावर किती खर्च झाला आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे

(५) असल्यास, सदर पाझर तलावाचे निकृष्ट बांधकाम प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (०४-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर पाझर तलाव बांधकाम प्रकरणी चौकशी झालेली नाही. सदर मूळ पाझर तलावाचे काम सन १९८२ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करण्यात आले असून कामावर रू.३.२८ लक्ष खर्च झाला आहे.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ अंतर्गत पाझर तलाव दुरूस्तीचे कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.२२,८४,९२८/- (गौणखनीज रॉयल्टीसह) व निविदा रक्कम रू.१४,८६,५५४/- (गौणखनीज रॉयल्टी वगळून) आहे. सदर दुरूस्ती कामावर कामाप्रित्यर्थ रक्कम रू.८,१५,५९५/- व गौणखनीजापोटी रक्कम रू.४,०९,६६१/- असा एकूण रक्कम रू.१२,२५,२५६/- खर्च झाला असून काम भौतिकदृष्टया पूर्ण झाले आहे. तथापि, माहे ऑगस्ट २०१९ मधील अतिवृष्टीमुळे दुरूस्तीसाठी वापरलेल्या HDPE शीटवरील १० मीटर भागातील मुरूम घसरून वाहून गेला आहे. सदर दुरूस्ती काम दोषदायित्व कालावधीमध्ये मक्तेदाराकडून पूर्ण न झाल्याने मक्तेदाराकडील अनामत रक्कम रू.१.९७ लक्ष जप्त करून निविदा शर्तीनुसार मक्ता रद्द करणेची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात**
**कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२१) ४४२१ (११-०४-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात अनेक वर्षापासून रिक्त असलेल्या आरोग्य सेवक व कर्मचा-यांच्या रिक्त पदांमुळे गोरगरिब रूग्णांना सेवा मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयात किती आरोग्य केंद्र व उपकेंद्रात रूग्णांना सेवा देण्यासाठी आरोग्य सेवक व कर्मचा-यांची आवश्यकता आहे व सद्यस्थितीत किती आरोग्य सेवक व कर्मचारी कार्यरत आहेत,

(३) असल्यास, उक्त जिल्हयात किती आरोग्य केंद्र व उपकेंद्रात आरोग्य सेवक व कर्मचा-यांची पदे रिक्त आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रूग्णांना सेवा देण्यासाठी आरोग्य सेवक व कर्मचा-यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) रायगड जिल्हा परिषद अंतर्गत ५२ प्राथमिक आरोग्य केंद्र व २८८ उपकेंद्र आहेत. रायगड जिल्हयामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यालय व जिल्हा हिवताप अधिकारी, कार्यालय या दोन कार्यालयात १८४० मंजूर ८२० रिक्त पदे आहेत आणि कंत्राटी तत्वावर २८८ मंजूर असून १२ रिक्त पदे आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी तत्वावर १५८ मंजूर, १४६ भरलेली असून १२ रिक्त पदे आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकिय अधिकारी यांची १०७ मंजूर, ५७ भरलेली आहेत व ५० पदे कंत्राटी पध्दतीने कार्यरत आहेत.

(४) राज्यातील सर्व जिल्हा परिषदेतील पदभरतीसाठी शासनाच्या महाआयटी कडून अर्ज मागविण्यची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तथापि, सद्यस्थितीत कोरोनाच्या पार्श्वभुमीवर वित्त विभागाच्या दिनांक ०४ मे, २०२० च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेकडील पदभरतीची कार्यवाही प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयासह राज्यातील आशा व गटप्रवर्तक कर्मचारी**
**यांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) ४६७३ (२२-०३-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी),**

**श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयासह राज्यातील आशा, गटप्रवर्तक महिला यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा या मुख्य मागणीसह अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित असल्याने दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास वाशिम येथे धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनाची दखल घेऊन कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०९-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) आशा व गटप्रवर्तक यांच्या मागण्यांपैकी काही मागण्यांची पुर्तता करण्यात आली असून उर्वरित मागण्यांवर कार्यवाही सुरु आहे.

तसेच दिनांक १७ जुलै, २०२० च्या शासन निर्णयान्वये आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना प्रत्येकी रु. २०००/- व रु. ३०००/- इतका मासिक प्रोत्साहनात्मक भत्ता लागू करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चिपळूण-संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लाभार्थ्यांची यादी दोन वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

**(२३) ४७२० (०९-०४-२०२०). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब व गरजूंना स्वत:चे घर या संकल्पनेतून शासकीय अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण-संगमेश्वर तालुक्यातील प्रत्येक गावातील गरीब व गरजूंना योजनेच्या अटी-शर्ती व निकषानुसार ठराविक लाभार्थ्यांना घरे मंजूर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जे लाभार्थी अ, ब व क वर्गात समाविष्ट होत नाहीत व जीपीएलमध्येही समोवश नाही अशा लाभार्थ्यांना ड यादीत समावेश करण्याच्या सूचना शासनामार्फत ग्रामपंचायतींना देण्यात आल्या असून त्यानुसार ग्रामपंचायतीनी लाभार्थीची निवड करुन ती यादी दोन वर्षापूर्वी शासनाकडे मंजूरीसाठी पाठविली असता सदर यादी प्रलंबित असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर लाभार्थ्यांची यादी दोन वर्षापासून शासनाकडे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत तसेच सदरहू यादीला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) जीपीएल अंतर्गत तयार करण्यात आलेल्या अ, ब, व क मध्ये समाविष्ट नसलेल्या परंतू घरकुलासाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळण्याकरीता प्रपत्र " ड" ची यादी तयार करण्यात आली आहे. सदर प्रपत्र "ड" याद्याचे सर्वेक्षण मार्च, २०१९ मध्ये "Awaas Plus" या ॲपद्वारे पुर्ण करण्यात आले असून सदर याद्या ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे मान्यतेस्तव सादर केल्या आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हा परिषदेअंतर्गत अंगणवाडी पर्यवेक्षिका पद भरतीत झालेला गैरव्यवहार**

**(२४) ४८०७ (१०-०४-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हा परिषदेअंतर्गत झालेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिका पदासाठी पात्र असताना डावलण्यात आलेल्या श्रीमती शशिकला धोंडीराम बांदल यांनी बीड जिल्हा परिषदेच्या विरोधात दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण केले आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात तेथील अधिकारी यांनी गैरव्यवहार करून इतर जणांची नेमणुकी केली असून, सदर प्रकरणात खोटी शपथपत्र दाखल करणाऱ्या अधिकारी यांच्यावर कारवाई करावी. महिला आयोग व खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणेअधिकारी, कर्मचाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्यात यावीत. नेमणुकीबाबत सर्व प्रकरण विभागीय आयुक्त यांना वस्तुस्थितीसह आस्थापना शाखेत सादर करावे अशी मागणी शशिकला बांदल यांनी आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय त्या चौकशीचे स्वरूप काय आहे .सदर प्रकरणात कोणकोणते अधिकारी-कर्मचारी दोषी आढळून आले आहेत,
(४) सदर, प्रकरणात दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-११-२०२०) :** (१) होय.
श्रीमती बांदल यांनी दिनांक २१/१२/२०१९ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण केले आहे.
(२) होय.
(३) प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन वस्तुस्थितीनुसार याचिका क्र.९७८१/२०१७ मध्ये मा.न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आले असून सद्य:स्थितीत श्रीमती बांदल यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे पुनर्विलोकन याचिका क्र.६६०४/२०१९ दाखल केली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळवण (जि.नाशिक) येथील ओतूर लघुपाटबंधारे प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढण्याबाबत**

**(२५) ५०१७ (१०-०४-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) येथील ओतूर लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम मार्गी लावावे या मागणीकरिता ओतूर, कुंडाणे, शिरसमणी, भुसणी, दहयाणे, परिसरातील शेतक-यांनी बसस्थानकासमोर मेनरोडवर ठिया देऊन रास्ता रोको आंदोलन केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओतूर लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या गळती प्रतिबंधक उपाययोजना C.W.P.R.S. पुणे यांचेकडून प्राप्त झालेनंतर सांडवा गळती व मातीधरण गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे सविस्तर अंदाजपत्रक प्राधान्याने करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने तातडीने अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-११-२०२०) :** (१) जानेवारी २०२० मध्ये ल.पा.तलाव,ओतुर प्रकल्पाचे काम मार्गी लावणेबाबत शेतक-यांनी बसस्थानकासमोर मेन रोडवर ठिया देऊन रास्ता रोको आंदोलन करणेबाबतचे कुठल्याही प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.

(२) होय.

(३) प्रकल्पाच्या सांडव्यातुन होणारी पाणी गळती प्रतिबंधित करण्यासाठी C.W.P.R.S पुणे यांचेकडे मार्गदर्शन मागविले असून, त्यानुसार C.W.P.R.S पुणे, यांनी दिनांक ०२.०१.२०२० व ०६.०२.२०२० रोजी पहाणी केली व धरणातील पाणी पातळी कमी झालेनंतर धरणाच्या पायाच्या वर्गीकरणासाठी चाचणी करण्याचे सूचविले होते. त्याअनुषंगाने C.W.P.R.S, पुणे मार्फत पुढील चाचण्या झालेनंतर त्यांच्या मार्फत सुचविण्यात येणा-या उपाययोजनेनुसार अंदाजपत्रक तयार करण्याचे प्रस्तावित होते. तथापि सद्य:स्थितीमध्ये कोव्हीड-१९ मुळे सदर चाचणी करण्याकरीता C.W.P.R.S चे वैज्ञानिक उपलब्ध होऊ शकले नाहीत.

तथापि सद्य:स्थितीतील धरणाचे तळ तलांक जुन्या उपलब्ध Bore holes data चा आधार घेऊन खोदकाम व जलरोधी खंदक काळया मातीने भरणे इ.परिणामे निश्चित करण्यात येऊन व सांडवा व पक्ष भिंतीचे बांधकाम पुर्णपणे नव्याने M-१५ संधानकात करणेचा अंतर्भाव करण्यात येऊन प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात आलेला असून महामंडळ स्तरावर तपासणीत आहे.

सदर प्रथम सुप्रमा अहवालास शासनाच्या मंजुरीनंतर निविदा कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर उपविभागीय पाटबंधारे विभाग (जि.बुलढाणा) अंतर्गत मेहकर, सुलतानपूर, लोणार व दुसरखेड या चार शाखांतील पदे रिक्त असल्याबाबत**

**(२६) ५३०५ (१०-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर उपविभागीय पाटबंधारे विभाग (जि.बुलढाणा) अंतर्गत मेहकर, सुलतानपूर, लोणार व दुसरखेड या चार शाखांतील सुमारे ८० पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदे भरण्यासंबंधातील आकृतीबंध अंतिम मान्यतेकरीता शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आकृतीबंधास तात्काळ मान्यता देऊन पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२९-१०-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

मेहकर उपविभागीय (जि.बुलढाणा) पाटबंधारे विभागाअंतर्गत मेहकर, सुलतानपूर, लोणार व दुसरखेड या चार शाखांतील एकूण मंजूर ८८ पदांपैकी ४५ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांमध्ये सिंचन व्यवस्थापनाशी निगडीत दप्तर कारकुन, कालवा निरीक्षक, मोजणीदार व गट 'ड' संवर्गातील कालवा चौकीदार व कालवा टपाली ही पदे रिक्त आहेत. सदर पदे सन, २०१२ नंतर भरती प्रक्रिया न राबविल्या गेल्याने तसेच मोठया प्रमाणात कर्मचारी निवृत्त झाल्याने रिक्त आहेत.

(२) जलसंपदा विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही सुरू असुन प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २ जून, २०१५ अन्वये सरळसेवा भरतीवर निर्बंध घालण्यात आले असून शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २५ मे, २०१७ अन्वये विभागाचा आकृतीबंध सुधारीत झाल्याशिवाय पदभरती करण्यास देखील निर्बंध आहेत. सद्यस्थितीत जलसंपदा विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे. त्यानुसार विभागाच्या आकृतीबंधास अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर गट क व गट ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करता येणे शक्य होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन (जि.जालना) शहरातील ग्रामीण रुग्णालयातील**
**रिक्त पदे भरुन आरोग्य सुविधा देण्याबाबत**

**(२७) ५३२६ (२२-०३-२०२०). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) शहरातील ग्रामीण रुग्णालयात अनेक रिक्त पदे भरली नसून आरोग्य सुविधा अपु-या असल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरून आरोग्य सुविधा देण्याबाबत शासनाकडे नागरिकांनी विनंती केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त कर्मचा-यांची पदे व आरोग्य सुविधा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२६-१०-२०२०) :** (१) हे अशंत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय भोकरदन येथील मंजूर आकृतीबंधानुसार खालीलप्रमाणे पदे रिक्त आहेत:-

| पद | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| कनिष्ठ लिपिक | ०२ | ०० | ०२ |
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०१ | ०० | ०१ |
| क्ष-किरण तंत्रज्ञ | ०१ | ०० | ०१ |
| अधिपरिचारीका | ०७ | ०४ | ०३ |
| दंतशल्यचिकित्सक | ०१ | ०० | ०१ |
| सफाईगार | ०२ | ०१ | ०१ |
| एकूण | १४ | ०५ | ०९ |

(२) होय, हे खरे आहे.

(३) आय.पी.एच.एस. अंतर्गत दोन अधिपरिचारीका उपलब्ध आहेत. त्यांच्याकडून काम करून घेतले जात असल्याने रुग्णांची गैरसोय होत नाही. तसेच, नियमित दंत शल्यचिकित्सक हे पद रिक्त असून कंत्राटी दंतशल्य चिकित्सक उपलब्ध करून घेण्यात आले असून त्यांच्याकडून सेवा पुरविल्या जातात. त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांची रिक्त्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पश्चिम विदर्भातील तीनही जिल्हयांमध्ये लघुपाटबंधारे विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२८) ५३५८ (११-०४-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील तीनही जिल्हयांमध्ये लघुपाटबंधारे विभागात ३०० पेक्षा जास्त पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे व कामकाजावर त्यांचा विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी वाशिम जिल्हयात ९९ पदे अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने येथील रिक्त पदांचा आढावा घेवून येथील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०२-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा, पदोन्नती व बदलीने भरण्याचे प्रस्तावित आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) हे पद भरण्यास वित्त विभागाने मान्यता दिली होती. त्यानुसार, कनिष्ठ अभियंता संवर्गातील (स्थापत्य) अभियंत्यांची ५०० पदे सरळ सेवेने भरण्याबाबत महापरिक्षा पोर्टल कडे प्रस्ताव पाठविला होता. तथापि, सदर पोर्टल रद्द झाल्याने भरती होऊ शकली नाही. आता दिनांक १७.८.२०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाने नमूद केले आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट ब -अराजपत्रित व गट -क संवर्गातील पदभरती प्रक्रियेबाबतच्या स्पर्धा परीक्षांसाठी यापुढे सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाच्या दिनांक २० फेब्रुवारी,२०२० च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार महाआयटीमार्फत Empanelment केलेल्या Vendor च्या यादीतून एका OMR Vendor (Service Provider) ची निवड करून परिक्षा प्रक्रिया पार पाडाव्यात. त्यानुसार महाआयटी सदर परिक्षा घेण्याबाबत निवड समितीला Vendor ची नावे उपलब्ध करून देणार आहे. त्यानुसार परीक्षा घेण्यात येईल. या प्रक्रियेस काही कालावधी लागणार आहे.

शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २ जून, २०१५ अन्वये सरळसेवा भरतीवर निर्बंध घालण्यात आले असून शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २५ मे, २०१७ अन्वये विभागाचा आकृतीबंध सुधारीत झाल्याशिवाय पदभरती करण्यास देखील निर्बंध आहेत. सद्यस्थितीत जलसंपदा विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे. त्यानुसार विभागाच्या आकृतीबंधास अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर गट क व गट ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करता येणे शक्य होईल.

तथापि, दरम्यानच्या कालावधीत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब (अराजपत्रित) पदोन्नतीने २१ कर्मचाऱ्यांची पदस्थापना अमरावती (पश्चिम विदर्भ) महसुल विभागात दिनांक ३१.८.२०२० रोजीच्या आदेशान्वये करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेबाबत**

**(२९) ५५७९ (०९-०४-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजना केंद्र पुरस्कृत योजना असून सन २०१६-१७ पासून ही योजना ग्रामीण भागात राबविण्याचे काम ग्रामविकास व पंचायतराज विभाग महाराष्ट्र शासन यांचेमार्फत राबविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ मध्ये झालेल्या दारिद्रय रेषेच्या सर्व्हेनुसार सन २००७-०८ ते २०१४-१५ मध्ये लाभार्थ्यांची निवड करून घरकुलांचा लाभ देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेअंतर्गत आलेल्या अर्जाची व ड फॉर्म अंतर्गत नव्याने आलेल्या अर्जाची संख्या किती आहे याबाबत शासनाने वेळेत घर मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१६-१७ या वित्तीय वर्षापासून केंद्र शासनाने इंदिरा अवास योजनेचे रूपांतर प्रधान मंत्री अवास योजना-ग्रामीण मध्ये केले असून सदर योजनेची अंमलबजावणी ग्राम विकास विभागामार्फत स्थापन करण्यात आलेल्या राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत करण्यात येते.

(२) नाही, हे खरे नाही.

सन २००७-०८ ते २०१४-१५ या कालावधीमध्ये राज्यात इंदिरा आवास योजना राबविण्यात येत होती. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड दारिद्रयरेषेखालील कुटुंबियांचे सर्वेक्षण (BPL Survey) २००२" च्या आधारे करण्यात येऊन त्यानुसार लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजने अंतर्गत लाभ देण्यात येत होते.

(३) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमध्ये ज्या कुटुंबांचा नावाचा समावेश झालेला नाही, परंतू जे घरकुलासाठी पात्र आहेत अशा कुटुंबाना घरकुलाचा लाभ मिळावा याकरीता राज्य शासनाने "प्रपत्र-ड " ची यादी तयार केली आहे. सदर प्रपत्र-ड यादीचे सर्वेक्षण माहे सप्टेंबर, २०१८ व माहे मार्च, २०१९ या कालावधीमध्ये करण्यात आले आहे. राज्यात "प्रपत्र-ड" मध्ये एकूण ५७,५५,०७९ इतके अर्ज प्राप्त झाले असून अंतिम यादी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे मान्यतेस्तव तथा पुढील मार्गदर्शक सूचनेस्तव सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अचलपूर पंचायत समिती (जि.अमरावती) अंतर्गत येणा-या अनेक गांवातील लाभार्थींना घरकुल अनुदान मिळण्याबाबत**

**(३०) ६४३९ (१६-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर पंचायत समिती (जि.अमरावती) अंतर्गत येणा-या अनेक गांवातील लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम होवून २/३ महिने झाले तरीही अनुदानाची रक्कम मिळाली नसल्याचे दिनांक १०.डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून घरकूल अनुदानापासून वंचित लाभार्थ्यांना तातडीने अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

प्रधान मंत्री अवास योजना (ग्रामीण) अंतर्गत केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के या प्रमाणानुसार प्रति घरकुल साधारण क्षेत्र रु.१,२०,०००/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रू.१,३०,०००/- एवढे अनुदान देण्यात येते. सदर योजनेंतर्गत या प्रकरणी केद्र शासनाकडून प्राप्त होणारा हिस्सा व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा समरुप हिस्सा प्राप्त न झाल्यामुळे राज्यस्तर नोडल खात्यामध्ये पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यामध्ये अनुदानाची रक्कम वितरित करता आली नाही.

(२) या प्रकरणी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येऊन सद्य:स्थितीत केंद्र व राज्य शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे. तसेच लाभार्थ्यांना बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. अचलपूर (जि.अमरावती) पंचायत समिती अंतर्गत माहे डिसेंबर, २०१९ ते फेब्रुवारी, २०२० या कालावधीतील प्रगती अहवालानुसार मंजूर २८८३ लाभार्थ्यांपैकी २८७३ लाभार्थींना पहिला हप्ता, २७०६ लाभार्थींना दुसरा हप्ता, २६४८ लाभार्थींना तिसरा हप्ता, १६२३ लाभार्थींना चौथा हप्ता व २४५८ लाभार्थींना पूर्ण रक्कम वितरित करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा मांडला (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील अप्पर वर्धा प्रकल्पाचे डाव्या कालव्याचे पाणी पाझरत असल्याने शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान**

**(३१) ६५८७ (१६-०४-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मांडला (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील शेतकरी श्री.गोविंद रामचंद्र इंगळे व श्री.किसनराव बोळाखे यांचे शेत अप्पर वर्धा प्रकल्पाचे डाव्या कालव्याचे पाणी पाझरल्याने वहिवाट योग्य राहीली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदहू शेतकरी सन २०००-२००१ पासून नुकसान भरपाई वा त्या शेती ऐवजी दुसरी शेती मिळण्याबाबत अनेक वर्षापासून मागणी करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई किंवा त्या ऐवजी दुसरी शेती देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-११-२०२०) :** (१) हे खरे नाही. दोन्ही शेतकऱ्यांच्या जमीनी ह्या नैसर्गिक नाल्यालगत असल्यामुळे व सखल भागात असल्यामुळे कालव्यातुन होणाऱ्या पाझरापेक्षा नैसर्गिक जलनित्सारण व्यवस्था योग्य नसल्यामुळे बाधित होत आहे. त्यामुळे नैसर्गिक नाल्यातील पाण्याचा व नाल्याची साफसफाई (झाडेझुडपे व गाळ काढणे) करणे आवश्यक आहे. तसेच पुर्वी खोदलेल्या पाझर नियंत्रण उपाय योजनांची पाटबंधारे संशोधन विभागाच्या अहवालानुसार निगा राखणे आवश्यक आहे. सदर निगा संबधित कास्तकाराने राखणे आवश्यक आहे.
(२) हे खरे आहे.
(३) लाभधारकांनी शेती चर व पाझर नियंत्रण उपाय योजना प्रमाणे दखल घेतली नसल्याने भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदे शैक्षणिक अर्हताप्राप्त स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक मधून विशेष धोरणात्मक बाब म्हणून भरण्याबाबत**

**(३२) ६८८० (१६-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदे शैक्षणिक अर्हता पात्र स्थापत्य अभियांत्रिकी सहायक मधून विशेष धोरणात्मक बाब म्हणून भरण्याबाबत लोकप्रतिनिधीनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना लेखी विनंतीपत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विनंतीपत्रावर शासनाने निर्णय घेऊन त्यावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२९-१०-२०२०) :** (१) नाही. तथापि, या विषयावरील महाराष्ट्र राज्य स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (पदवी व पदविका) कर्मचारी संघटना, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र यांचे दि.१७.०२.२०२० रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) शासन अधिसूचना, दि.१ जानेवारी, १९९८ अन्वये, कनिष्ठ अभियंता सेवा प्रवेश नियमामध्ये, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक हे पद धारण करणाऱ्या व या पदावरील तीन वर्षापेक्षा कमी नसेल, इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या आणि अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय यांच्याकडून घेण्यात येणारी कनिष्ठ अभियंता या पदाची अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण केलेल्या व्यक्ती मधून योग्यतेच्या अधीन ज्येष्ठतेच्या तत्वावर एखाद्या व्यक्तीस पदोन्नतीने भरण्याची तरतूद आहे. त्यानुसार पात्र स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हा परिषद कार्यालयात अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नसल्याबाबत**

**(३३) ७६७० (१६-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा परिषद कार्यालयात विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत कार्यालयातील उपस्थितीची नोंद व्हावी करिता जिल्हा परिषद प्रशासनाकडून सर्व विभागात सी.सी. टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद कार्यालयातील बहूतांश विभागातील सी.सी. टीव्ही कॅमेरे बंद असल्याने विभागातील कर्मचारी व अधिकारी आपल्या कार्यालयीन वेळेत कामावर पुर्ण वेळ हजर राहत नसल्याचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्यासह बंद असलेले सी.सी. टीव्ही कॅमेरे तातडीने सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) होय.

(२) होय. हे अंशतः खरे आहे.

दोन कर्मचा-यां व्यतिरीक्त इतर अधिकारी/कर्मचारी गैरहजर नाही.

(३) गैरहजर कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हा परिषद, जालना यांचे तर्फे प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात शस्त्रक्रियासाठी शस्त्रक्रिया साहित्य उपलब्ध होत नसलेबाबत

**(३४) ९५३२ (०३-०६-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात वार्ड प्रमुख अथवा विभाग प्रमुख हे रुग्णांकडे दूर्लक्ष करीत असून रुग्णांवर शिकाऊ डॉक्टरांकडून उपचार केले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थोपेडीक तसेच इतर उपचाराकरिता आलेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणारे साहित्य वेळेवर उपलब्ध होत नसल्याने रोज मोजक्याच शस्त्रक्रिया केल्या जात असल्यामुळे शस्त्रक्रियेकरिता रुग्ण दाखल झाल्यापासून २० ते २५ दिवसांनंतर त्याची शस्त्रक्रिया केली जात असल्याने या कालावधीत रुग्ण दगावण्याची शक्यता निर्माण होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ससून सर्वोपचार रुग्णालयातील शिकाऊ डॉक्टरांवर अनुभवी डॉक्टर तसेच विभाग प्रमुख यांनी नियंत्रण ठेवणे तसेच शस्त्रक्रियेकरिता त्वरित साहित्य उपलब्ध देणेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०६-११-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या शून्य ते पाच वयोगटातील अडीच हजाराहून अधिक नवजात बालकांना पक्षाघात झाल्याबाबत

**(३५) १०७५७ (०३-०६-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार मागील दोन वर्षात ० ते ५ वयोगटातील अडीच हजाराहून अधिक नवजात बालकांना पक्षाघात झाल्याचे निदान झाले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार नवजात बालकांना पक्षघात होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०९-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(राज्य स्तरावर प्राप्त झालेल्या आठवडी Acute Flaccid Paralysis च्या अहवालानुसार सन २०१८ मध्ये १८८६, सन २०१९ मध्ये २३१० व सन २०२० मध्ये जानेवारी ते मे ३१८ असे संशयीत (suspected) एवढी Acute Flaccid Paralysis ची प्रकरणे आढळून आली आहेत. वरील संशयीत (suspected) एवढी Acute Flaccid Paralysis च्या प्रकरणाच्या विष्ठेचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. सदर प्राप्त झालेल्या अहवालानुसार कोणत्याही प्रकरणाला पोलिओ संक्रमण झाल्याचे आढळून आले नाही.

(२) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) बालकांना पोलिओ होऊ नये यासाठी राज्यामध्ये नियमित लसीकरण कार्यक्रम अंतर्गत बालकांना पोलिओची मात्रा जन्मानंतर १५ दिवसाच्या आत दिली जाते.तसेच बालकाला लसीकरण वेळापत्रकानुसार दीड महिन्यापासुन एक महिन्याच्या अंतराने ३ डोस ओरल पोलिओ (Oral Polio) चे दिले जातात.त्याचप्रमाणे बाळ दीड वर्षाचे झाल्यानंतर पोलिओचा बुस्टर डोस दिला जातो.राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम व उप राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम व AFP Survelliance हे कार्यक्रम राबविले जातात.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) विधानसभा क्षेत्रातील घरकुल आवास योजनेसह इतर घरकुल लाभाच्या योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३६) ११३५८ (१६-०७-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) विधानसभा क्षेत्रातील घरकुल आवास योजनेसह इतर सर्व घरकुल लाभाच्या योजनांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी गरजू व गरीब ग्रामस्थांना डावलून बोगस लाभार्थ्यांना लाभ देऊन तसेच नविन घरकुल न बांधता जुन्या घरांना रंगरंगोटी करून शासनाची फसवणूक करून गैरव्यवहार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने खडकवासला विधानसभा क्षेत्रातील घरकुल आवास योजनेसह इतर सर्व घरकुल लाभाच्या योजनांच्या सन २०१६ ते माहे जून-२०२० या दरम्यान झालेल्या कामांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील ग्रामीण रुग्णालयातील क्ष-किरण मशीन तंत्रज्ञ पद रिक्त असल्याबाबत**

**(३७) ११७४२ (०९-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील ग्रामीण रुग्णालयात क्ष-किरण मशीन तंत्रज्ञ हे पद रिक्त असल्याने तंत्रज्ञाअभावी एक्स-रे मशीन बंद पडले असल्याची बाब माहे जून,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्ष-किरण मशीन चालवण्यास तंत्रज्ञ नसल्याने या ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पद भरण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२९-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय मानवत येथील क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी यांना ग्रामीण रुग्णालय बोरी येथे प्रत्येक बुधवार व गुरूवार दोन दिवस क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी म्हणून कामकाज सोपविण्यात आले आहे.

(३) गट क पदभरतीसाठीची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक परिमंडळामध्ये आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाच्या भरती प्रक्रियेत झालेला गैरप्रकार**

**(३८) ११७५१ (१४-०९-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नाशिक परिमंडळामध्ये आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ (लॅब टेक्निशियन) या पदाकरिता राबविण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे गैरप्रकार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,प्रयोगशाळा तंत्रज्ञ (लॅब टेक्निशियन) पदाकरिता एकाच उमेदवारांची दोन वेळा निवड झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भरती प्रक्रिया रद्द करून त्यात सुसूत्रता आणून नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२९-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर भरती प्रक्रिया कोवीड-१९ साथरोगासाठी अत्यंत तात्पुरत्या (३ महिने) कालावधीसाठी करण्यात आली होती. पात्रता यादीत निवड केलेल्या ५० उमेदवारांपैकी प्रत्यक्षात केवळ १५ उमेदवार ३ महिन्यांच्या कालावधीसाठी रूजू झालेले आहे. नियुक्ती अधिकारी यांच्या निदर्शनास दोन उमेदवारांचे नाव दोन वेळा यादीत आल्याचे निदर्शनास आल्याबरोबर यादीत सुधारणा केली आहे व संबंधीत दोन उमेदवारांपैकी एक उमेदवार रूजू झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीचा विकास करण्यासाठी बृहत आराखडा तयार करणेबाबत**

**(३९) १२४३६ (०९-०९-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादासाहेब फाळके मराठी रंगभूमी व चित्रनगरी (फिल्मसिटी) गोरेगाव पूर्व (मुंबई) याचा कारभार शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून होत असून या चित्रनगरीस बदलत्या काळानुसार नवीन रूप देण्यासाठी स्थानिक लोकप्रतीनिधिनी मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य विभाग व शासनाकडे अनुक्रमे दिनांक २८ जानेवारी, २०१३ व ३ जून, २०१३ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चित्रनगरीचा बृहत आराखडा (मास्टरप्लान) तयार करून अमेरिकेतील युनिवर्सल स्टुडीओ किंवा हैद्राबादचा रामोजीराव कलादालन याप्रमाणे विकास करणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १९ जानेवारी, २०२० व मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांना दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही याबाबत कोणतीही अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चित्रनगरीचा विकास करण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्यासह या परीक्षेत्रात वाढणाऱ्या अनधिकृत झोपडपट्ट्या व चित्रिकरणाच्या माध्यमातून महसुलात वाढ होण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०४-११-२०२०) :** (१) सदर पत्रव्यवहार कार्यासनाच्या अभिलेखात आढळून आलेला नाही.

(२) हे खरे आहे.

(३) चित्रनगरीच्या परीसरामध्ये सिनेनिर्मीती उद्योगासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे व शासनाचा महसूल वाढवण्याच्या दृष्टीकोनातून युनिवर्सल स्टुडिओ अथवा हैद्राबादच्या रामोजी

चित्रनगरी प्रमाणे विकास करणेबाबत बृहत आराखडयास पायाभूत समितीच्या दिनांक २८.११.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली. त्यानुसार दिनांक १२.०७.२०१८ ते १६.०४.२०१९ या कालावधीमध्ये निविदा मागविण्यात आली होती. त्यास प्रतीसाद मिळाला नसल्याने दिनांक १४.०८.२०१९ ते ३१.०२.२०२० या कालावधीमध्ये पुनश्च निविदा मागविण्यात आली होती. तथापि, निविदेस प्रतिसाद मिळाला नाही. याविषयी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल.
(४) अनधिकृत झोपड्या वाढू नयेत यासाठी पात्र झोपड्यांचे पुनर्वसन विकासकामार्फत करुन उर्वरित जागेत संरक्षक भिंत बांधून जागा संरक्षीत करणे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कुपोषित बालकांना वितरीत करण्यात येण्या-या ईडीएनएफ पेस्टबाबत**

**(४०) १२४४० (०८-०९-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील तीव्र कुपोषित अर्थात सॅम श्रेणीतील बालकांच्या उपचारासाठी स्थानिक आहाराचा समावेश असलेली ग्राम बाल विकास केंद्रा (व्हीसीडीसी) मधून ईडीएनएफ पेस्ट पाकिटांचा पुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बराचश्या बालकांना ही पेस्ट खाल्यावर उलट्या व जुलाब याचा त्रास होत असल्याने पालक ही पाकिटा मधील पेस्ट बालकांना देत नसून सुध्दा या पाकिटांचे वितरण नियमित सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पाकिटांचा वापर होत नसतानाही त्याचे वितरण सुरू ठेवणे व 'नॅशनल टेक्निकल बोर्ड ऑन न्युट्रीशन'ला वगळून केलेल्या निर्णयाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, RUTF (EDNF) च्या घरगुती वापरामुळे बालकांच्या आहार पद्धती आणि स्तनपानावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असतानाही हे वितरण सुरू ठेवणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०९-११-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील सॅम बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्राची स्थापना करण्यात आली असून ग्राम बाल विकास केंद्रात सॅम बालकांची अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचे मार्फत स्क्रिनिंग केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केल्यावर ज्या सॅम बालकांना कोणतेही दुर्धर आजार नाहीत अशा बालकांना ग्राम बाल विकास केंद्रात दाखल करण्यात येते. ग्राम बाल विकास केंद्रात सॅम बालकांना औषध उपचार देवून त्यांना वैद्यकीय अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या

मात्रानुसार मायक्रोन्युट्रियन्ट फोर्टीफाईड शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेले EDNF फुड देण्यात येते.

(२) हे खरे नाही.

EDNF फुड खाल्यानंतर एखाद्या बालकास उलटी होऊ शकते. तथापि, सरसकट सर्वच बालकांना उलटी होत नाही. तसेच बालकांना ही पेस्ट खाल्यावर उलटया व जुलाब याचा त्रास होत असल्याची कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

EDNF फुड खावू घातल्यामुळे सॅम बालकांच्या वजनात वाढ होवून सर्व श्रेणीवर्धन झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सुधारणा झालेल्या बालकांची टक्केवारी ही ८२.३१ इतकी झाली आहे आणि म्हणून सदर EDNF फुड हे सॅम बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी उपयुक्त आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

## पालशेत (ता.गुहागर,जि.रत्नागिरी) येथील जोशी भोसलेवाडी मधील विहिरीच्या दुरुस्तीचे काम मागील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

**(४१) १२९२९ (१७-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालशेत (ता.गुहागर,जि.रत्नागिरी) येथील जोशी भोसलेवाडी मधील विहिरीच्या दुरुस्तीचे काम जलयुक्त शिवार योजनेतून ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, गुहागर मार्फत सुरू करण्यात आले असून त्याबाबतची वर्कऑर्डर दिनांक १४ मार्च २०१८ रोजी ठेकेदाराला दिल्यानंतर एक वर्ष दहा महिन्याच्या कालावधीत ठेकेदारांनी तांत्रिक कारणास्तव काम पूर्ण केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामपंचायत पाणीपुरवठा समिती आणि ग्रामस्थांनी उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग गुहागर, तहसीलदार गुहागर, जिल्हाधिकारी रत्नागिरी आदींकडे लेखी निवेदन देऊनही त्याकडे दुर्लक्ष व दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालशेत गावाला पाण्याची तीव्र पाणी टंचाई भासत असल्याने व विहिरींच्या दुरुस्तीच्या कामास विलंब झाल्याने दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजी शिवस्वराज्य शेतकरी संघटनेच्या मदतीने पालशेत येथील जोशी भोसले वाडीतील ग्रामस्थांनी पंचायत समितीच्या मासिक सभेच्या दिवशी पंचायत समितीच्या कार्यालयासमोर उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (०६-११-२०२०) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.
(४) मौजे पालशेत भोसलेवाडी येथे विहिर बांधणे या कामास दिनांक १४/३/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदर कामाची (पावसाळा वगळून) एक वर्षाची मुदत दि.३०/११/२०१९ रोजी संपली होती. परंतु मक्तेदाराचे कुटुंब अपघातग्रस्त झाल्याने मक्तेदार काम करू शकला नाही. तसेच विहिरीला खोदाई करताना कातळ लागल्याने व पाण्याचे झरे त्या कातळामध्ये असल्याने विहिरीचे पाणी कमी होईल या भितीने ग्रामस्थांनी विहिरीचे बांधकाम खालून न करता मधल्या भागातूनच (कातळाच्या वरून) करण्याची मागणी केल्यामुळे कामाबाबत निर्णय घेण्यास विलंब झाला होता. परंतु मक्तेदाराने मुदतवाढीची मागणी केल्यानूसार त्यांना पुढील ३ महिने दिनांक २९/२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली व त्या मुदतीत मक्तेदाराने काम पूर्ण केले आहे. सदर काम पूर्ण झालेबाबत पालशेत निवोशी भोसलेवाडी येथील ग्रामस्थांनी व संरपंच, ग्रामपंचायत पालशेत यांनी लेखी पत्राद्वारे कळविले आहे.

सदर कामास विलंब झाल्याबद्दल मक्तेदारास निविदा रक्कमेच्या एक टक्के रक्कम एवढा दंड करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडकी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथे वास्तव्यास असलेल्या**
**नागरीकांना कायम स्वरूपी घरपट्टा देण्याबाबत**

**(४२) १२९४३ (११-०९-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडकी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील वार्ड क्र ४ मधिल येथे मागील १० ते १५ वर्षापासून वास्तव्यात असलेल्या नागरीकांना कायम स्वरूपी घरपट्टा देण्यात आला नसल्याने घरकुल योजने पासून वंचित असल्याचे दिनाक १२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वास्तव्यात असलेले नागरीक हे दारिद्र रेषेमधील असुन त्यांच्याकडे अंतोदयचे कार्ड आहे परंतु स्वत:ची जागा नसल्याने घरकूल योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार वडकी येथील नागरीकांना कायम स्वरूपी घरपट्टा देऊन घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०६-११-२०२०) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) होय,
(४) सर्वांसाठी घरे-२०२२ योजनेंतर्गत राज्य शासनाने प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण ) व इतर राज्यस्तरीय ग्रामीण गृहनिर्माण योजनेतंर्गत पात्र लाभार्थ्यांनी ग्रामीण भागातील शासकीय

जमिनीवर निवासी प्रयोजनासाठी केलेले अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे धोरण दि.१६.२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केले आहे. त्यानुसार सर्वसाधारणपणे गायरान जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वन क्षेत्र तसेच ज्या जमिनींवर वास्तव्य करणे शक्य नाही अशा जमिनी वगळून इतर शासकीय जमिनीवरील दि.१.१.२०११ पर्यन्तची निवासी प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची तरतूद या शासन निर्णयान्वये केली आहे. प्रस्तुत प्रकरणी पंचायत समिती राळेगाव जि.यवतमाळ अंतर्गत ७३ ग्रामपंचायती असून त्यापैकी वडकी ग्रामपंचायत अंतर्गत वार्ड क्र.४ मध्ये ३३ अतिक्रमणधारक वास्तव्यास आहेत. सदर अतिक्रमणे खाजगी जमिनीवरील असल्याने या अतिक्रमणधारकांना घरपट्टे उपलब्ध करणे शक्य होत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पेडगांव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील भुईकोट किल्याचे संवर्धन करणेबाबत**

**(४३) १३०६९ (०९-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पेडगांव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या ठिकाणी भुईकोट किल्ला असून या किल्यांची पुरातन विभागाकडून देखभाल करणेत येत नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त किल्ल्याच्या संवर्धन, दुरुस्ती व देखभालीसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०५-११-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मौजे पेडगाव येथील भुईकोट किल्ला हा राज्य संरक्षित स्मारक नाही.
(२) मौजे पेडगाव येथील भुईकोट किल्ला हा राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यासाठी सहायक संचालक, नाशिक यांच्याद्वारे महसूल विषयक कागदपत्रे मिळविण्यासाठी तहसीलदार कार्यालयाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. संचालनालयाच्या स्तरावर महसूल विषयक कागदपत्रे तपासून सदर किल्ला व मंदीर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची नियमानुरुप कार्यवाही अनुसरण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील फिल्मसिटी मध्ये मालिकाच्या चित्रीकरणासाठी लागण्या-या साधन समुग्रीच्या दरात सवलत मिळणेबाबत**

**(४४) १३१३४ (०९-०९-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणूचा संसर्गाचा प्रादुर्भात रोखण्यासाठी जाहीर केलेल्या टाळंबंदीमुळे मुंबई येथील फिल्म सिटी मध्ये सुरु असलेल्या मालिकाच्या चित्रीकरणासाठी लागण्या-या साधन समुग्रीच्या दरात सवलत मिळावी अशी मागणी निर्मात्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०४-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) टाळेबंदीच्या कालावधीत ज्या निर्मितीसंस्थांचे सेट चित्रनगरी परीसरात ६ ते १२ महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी आहेत, अशा निर्मिती संस्थांना टाळेबंदीच्या कालावधीत (दि.१६ माचे, २०२० ते १४ जून, २०२०) एकूण निर्धारित भाड्याच्या २५ टक्के भाडे सवलत संचालक मंडळाच्या मान्यतेच्या अधीन राहून व उर्वरीत ७५ टक्के भाडे रकमेतील ५० टक्के रक्कम दि.३० सप्टेंबर, २०२० व उर्वरीत ५० टक्के रक्कम दि. ३१ ऑक्टोबर, २०२० अखेरपर्यंत विना विलंब महामंडळास जमा करण्याबाबत महामंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस आशा कार्यकर्त्यां यांना विमा संरक्षण मिळणेबाबत**

**(४५) १३२२७ (१०-०७-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात ३१२५ ग्रामपंचायत कर्मचारी, ४४२१ अंगणवाडी सेविका, ३५३० अंगणवाडी मदतनीस, २६४९ आशा कार्यकर्त्या असे मिळून १३ हजार ७२५ कर्मचारी जिल्हयातील गावपातळीवर करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी सातारा जिल्हयातील ग्रामीण पातळीवर ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी,मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच आशा कार्यकर्त्या यांना मानधनाव्यतिरिक्त प्रोत्साहनपर रक्कम व त्यांना ९० दिवसांचा २५ लाख रुपये रक्कमेचा विमा उतरविण्यात यावा व या दोन्ही योजनांसाठी चौदाव्या वित्त आयोगाचा निधी वापरण्यात यावा असे आदेश ग्रामविकास विभागांतर्फे निर्गमित केले असल्याचे दिनांक १९ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने आदेश देऊनही विमा संरक्षण देण्याबाबत जिल्हा प्रशासनाने विमा कंपन्यांशी दोन महिने होवूनही अद्याप करार केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन रक्कम देवून विमा संरक्षण देण्याकरिता कंपन्यांशी करार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०६-११-२०२०) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) होय, शासन परिपत्रक क्र.चौविआ-२०२०/प्र.क्र.४२/वित्त-४ ग्राम विकास विभाग, मुबई दि.३१.३.२०२० नुसारग्रामीण पातळीवर ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच आशा कार्यकर्त्या यांना मानधनाव्यतिरिक्त १३७२५ व्यक्तींना प्रोत्साहनपर रक्कम रू. १३७२५०००/- मानधन देण्यात आलेले आहे. व त्यांना ९० दिवसांचा २५ लाख रूपये रकमेचा विमा उतरविण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरून चौदाव्या वित्त आयोगाचा निधी वापरून कार्यवाही करणेबाबत प्राप्त झालेल्या सुचनेनुसार कार्यवाही संरू करण्यात आली होती.
(३) होय.
(४) याबाबत दि.८.७.२०२० च्या परिपत्रकानुसार जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी / कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील कार्यरत असलेले कंत्राटी पध्दतीवरील कर्मचारी / कामगार यांना ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत रू. ५० लाखाचे विमा कवच देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघातील (जि.नाशिक) अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) १३२३७ (०९-०९-२०२०). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघातील (जि.नाशिक) अनेक सिंचन प्रकल्प गेल्या २५ ते ३० वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी पाण्याचा तूटवडा निर्माण होऊन स्थानिक नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०२-११-२०२०) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे. इगतपूरी तालुक्यातील उर्ध्व कडवा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प तसेच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील किकवी पेयजल प्रकल्प या दोन प्रकल्पांची कामे प्रलंबित आहेत. तसेच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील वाघेरा, अंबोली-

बोंबीलटेक पाडा या दोन प्रवाही वळण योजना भैातिकदृष्ट्या पूर्ण असून प्रवाही वळण योजना पेंगलवाडी या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. भविष्यकालीन कळमुस्ते व अंबोली वेळुंजे या दोन त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आणि कापवाडी ही एक इगतपुरी तालुक्यातील अशा एकूण तीन वळण योजना प्रस्तावित आहेत.

(२) सदर बाब या विभागाच्या अखत्यारीत येत नाही.

(३) इगतपूरी तालुक्यातील उर्ध्व कडवा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प तसेच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील वाघेरा, अंबोली-बोंबीलटेक पाडा या दोन प्रवाही वळण योजना भैातिकदृष्ट्या पूर्ण असून प्रवाही वळण योजना पेंगलवाडी या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. भविष्यकालीन कळमुस्ते व अंबोली वेळुंजे या दोन त्र्यंबक तालुक्यातील आणि कापवाडी ही एक इगतपुरी तालुक्यातील अशा एकूण तीन वळण योजना प्रस्तावित आहेत. त्यापैकी कळमुस्ते प्रवाही वळण योजनेस शासनाची मान्यता/पुर्वपरवानगी शासन पत्र जा.क्र.संकिर्ण २०२० (८०/२०) / जसंअ दि.१३/०७/२०२० अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

उर्ध्व कडवा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प सुरु होण्याच्या दृष्टीने प्रकल्पग्रस्तांशी व्यक्तीश: संपर्क साधून भूसंपादनासाठी संमती मिळविणेची तसेच भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये भूसंपादन प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही सुरू आहे.

किकवी पेयजल प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यासाठी दि.०५/०९/२०१४ रोजी कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

(४) उर्ध्व कडवा बृहत ल.पा. प्रकल्पासाठीच्या भुसंपादनास प्रकल्पग्रस्तांचा तीव्र विरोध असल्याने सदर प्रकल्पाच्या बांधकामास विलंब होत आहे.

किकवी पेयजल प्रकल्प बांधणे विरुध्द जनहित याचिका क्र.१४६/२०१३ मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेली आहे. अद्याप सुनावणी झालेली नाही. तसेच कामाची निविदा विखंडीत करणेबाबत शासनाचे सप्टेंबर, २०१६ मध्ये आदेश प्राप्त असून सदर कामाची निविदा दि.१६/०१/२०१८ रोजी विखंडीत करण्यात आलेली आहे. संबंधित कंत्राटदाराने त्याविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई येथे याचिका क्र. १३१३९/२०१७ दाखल केली आहे.

पेंगलवाडी वळण योजनेच्या लिंककटचे ३३० मीटरचे खोदकाम शिरपुंजे प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यते अभावी बंद आहे. सद्यःस्थितीत सुप्रमा प्रस्तावाची राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे तपासणी प्रगतीत आहे.

---

### कुकडी, घोड, विसापूर प्रकल्पात (ता.जि.पुणे) कार्यालयीन अधिकारी व कर्मचा-यांचे पदे रिक्त असल्याबाबत

**(४७) १३२५४ (०९-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी, घोड, विसापूर प्रकल्पात (ता.जि.पुणे) कार्यालयीन अधिकारी व कर्मचा-यांचे अनेक वर्षापासून रिक्त पदे निर्माण झालेले असून या प्रकल्पात कमी संख्येत अधिकारी व कर्मचारी

कार्यरत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०२-११-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. कुकडी, घोड, विसापूर प्रकल्पात (ता.जि.पुणे) येथील गट-अ व गट-ब संवर्गातील एकूण ११२ पदे तसेच गट-क एकूण ८१६ आणि गट-ड एकूण २५३ पदे अशी एकूण ११८१ पदे माहे जून, २०२० अखेर रिक्त आहेत.

(२) गट-अ व गट-ब संवर्गातील ही पदे शासन स्तरावरील नियुक्तीने /बदलीने /पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय, दि.२५ मे, २०१७ अन्वये, विभागाचा नवीन आकृतीबंध मंजूर होत नाही. तो पर्यंत गट-क व गट-ड पदे भरतीस निर्बंध आहे. तसेच शासन निर्णय दि.२५ जून, २०१६ सरळसेवेने पदभरतीवर निर्बंधामुळे रिक्त पदांचे ५०% किंवा एकुण संवर्गाचे ४% पैकी जे कमी असेल ती पदे विचारात घ्यावीत. तथापि, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांची सरळ सेवेची भरती करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुसार ५०० पदांच्या भरतीबाबत अध्यक्ष, निवड समिती, मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प), जलसंपदा विभाग, पुणे यांच्याकडून महापरिक्षा पोर्टलवर मागणी नोंदविण्यात आली आहे. तथापि, महापरिक्षा पोर्टलला शासनाने स्थगिती दिल्याने सदर भरती होवू शकली नाही.

शासनाचे नवीन धोरणानुसार दि. १७.०८.२०२० च्या शासन निर्णयान्वये महाआयटी मार्फत दि.२० फेब्रुवारी २०२० च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार Empanelment केलेल्या Vendor च्या यादीतून एका OMR Vendor ची निवड करुन परीक्षा पार पाडाव्यात असे नमूद केले आहे. त्यानुसार परीक्षा घेण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

माहे ऑगस्ट, २०२० अखेर १६४ स्थापत्य अभियंत्रिकी सहायकांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यापैकी पुणे महसून विभागात १५ कर्मचाऱ्यांची पदस्थापना करण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र दि.२७ डिसेंबर, २०१७ पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे सदर पदे रिक्त ठेवावी लागत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आदिवासी बहुल जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त पालघर जिल्ह्यात बालमृत्यूचे प्रमाण कमी करून कुपोषणाचा प्रश्न सोडविण्याबाबत

**(४८) १४४३१ (१४-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्य जिल्हयांच्या तुलनेत सर्वांगिण सक्षम असलेल्या ठाणे जिल्हयाच्या ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागात सुमारे १,५४८ बालके तीव्र कमी वजनाची असून कुपोषित बालकांमध्ये ७९ बालके तीव्र कुपोषित, ९७१ बालके मध्यम कुपोषित, तर १५९ बालके दुर्धर आजारानी ग्रासले असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, आदिवासी बहुल जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त पालघर जिल्ह्यात कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी अंगणवाड्या तसेच आरोग्य यंत्रणा अपयशी ठरल्याने माहे एप्रिल, मे, २०२० पासून येथील कुपोषित बालक- मातांची संख्या वाढल्याने बालमृत्यू वाढले असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विभागात कुपोषण निर्मूलनासाठी विविध विभागाच्या समन्वयाने ग्राम बालविकास केंद्र व संवादाच्या माध्यमातून सकस आहार व पोषण आहार मिशन राबवूनही कुपोषण व बालमृत्यू कमी झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तदनूसार कुपोषित बालकांना वेळीच उपचार व सकस पोषण आहार उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०९-११-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हयामध्ये शहापूर,डोळखांब हे दोन प्रकल्प पूर्णत: आदिवासी बहूल प्रकल्प असून मुरबाड-१, मुरबाड-२, भिवंडी हे अंशत: आदिवासी प्रकल्प आहेत. भिवंडी-१, कल्याण, अंबरनाथ हे ग्रामीण प्रकल्प असून या सर्व प्रकल्पात मिळून ठाणे जिल्हयात माहे जून २०२० मध्ये २७८५ बालके तीव्र कमी वजनाची असून कुपोषित बालकांमध्ये ५५ बालके तीव्र कुपोषित, १०७९ बालके मध्यम कुपोषित तर १२४ बालके दुर्धर आजार आहेत. उक्त तीव्र कुपोषित ११६ सॅमच्या बालकांना ग्राम बाल विकास केंद्रात दाखल करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील सॅम बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्राची स्थापना करण्यात आली असून सॅम बालकांना EDNF खावू घातल्यामुळे सॅम बालकांच्या वजनात वाढ होवून सर्व बालकांचे श्रेणीवर्धन झाल्याचे आढळून आले आहे.

दि.१ एप्रिल,२०१९ ते ३१ मार्च २०२० अखेर ६०८१ बाल विकास केंद्र होती व ८२०१ इतक्या सॅम बालकांना दाखल करण्यात आले होते. ग्राम बाल विकास केंद्रांमध्ये दाखल केलेल्या ८२०१ सॅम बालकांना EDNF खावू घातल्यामुळे ८२०१ सॅम बालकांपैकी ४२२४ इतकी बालके सर्वसाधारण श्रेणीत आले आहेत व सॅम मधून २५२७ इतकी बालके मॅम श्रेणीत आली आहेत. श्रेणी सुधारणा झालेल्या बालकांची टक्केवारी ८२.३१ इतकी आहे.

(४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत खालीलप्रमाणे लाभार्थी निहाय आहार देण्यात येत आहे.

१) ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी व गरोदार स्त्रीया व स्तनदा माता यांना घरपोच आहार नियमितपणे देण्यात येत आहे.

२) सद्य:स्थितीत कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार ऐवजी THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येत आहे.

३) आदिवासी भागात अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्तनदा मातांना चौरस आहार देण्यात येत आहे व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ वेळा अंडी, केळी सुध्दा देण्यात येत आहे.

४) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येत आहे.

राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील सॅम बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्राची स्थापना करण्यात आली असून ग्राम बाल विकास केंद्रात सॅम बालकांची अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचे मार्फत स्क्रिनिंग केल्यावर वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर ज्या सॅम बालकांना कोणतेही दुर्धर आहार नाही अशा बालकांना ग्राम बाल विकास केंद्रात दाखल करण्यात येते. ग्राम बाल विकास केंद्रात सॅम बालकांना औषध उपचार देवून त्यांना वैद्यकीय अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या मात्रानुसार मायक्रोन्युट्रियन्ट फोर्टीफाईड EDNF हा शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेला आहार सॅम बालकांना देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या दुरुस्ती कामात झालेला गैरव्यवहार

**(४९) १४५८७ (२०-०८-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी-मोरगांव विधानसभा क्षेत्रातील सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील वळेगांव व काळागोटा या ठिकाणी १५ वर्षा पुर्वी कोल्हापुरी बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात आले असता त्या बंधाऱ्याची अल्पावधीमध्ये दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,संबंधित शाखेतील शाखा अभियंता आणि कंत्राटदार यांनी संगनमताने बंधाऱ्याच्या दोन्ही बाजुला खिंड न बुजविता दुरुस्ती करुन बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाची रक्कम घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित शाखा अभियंता यांना निलंबित करण्यासह कंत्राटदाराचे परवाने रद्द करुन संबंधित बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी घेतलेली रक्कम त्यांच्याकडून वसुल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (०४-११-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रत्यक्षात दोन्ही बंधा-याचे बांधकाम सन १९९४-९५ मध्ये करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

कालागोटा (नं.०२) या बंधा-याची सन २००५-०६ मध्ये तसेच वडेगाव (कालागोटा नं.०१) या बंधा-याची सन २००८ व सन २०१९ मध्ये दुरुस्ती करण्यात आली होती. प्रत्यक्षात झालेल्या कामांची मोजमापानूसार कंत्राटदारास कामाच्या देयकांची रक्कम देण्यात आली होती.

(३) सदर बंधा-याबाबत वर्तमानपत्रात माहे मे, २०२० च्या सुमारास निदर्शानस आलेल्या बातमीनुसार चौकशी करण्यात आली असुन प्रत्यक्षात झालेल्या कामांचे मोजमापानूसार देयके देण्यात आले होते. सद्यस्थितीत कालागोटा (नं ०२) बंधा-याचा काठ वाहून (आऊट फ्लँक) गेलेला आहे. सदर को.प. बंधारा दुरुस्ती कामाचे सर्वेक्षण करुन अंदापत्रक तयार करण्यात आले असुन मंजुरीनंतर निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीचे काम करण्यात येईल. तसेच वडेगाव कालागोटा (नं ०१) बंधारा सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्बवत नाही.

---

**रत्नागिरी येथील लोकमान्य टिळक यांच्या जन्मस्थळ व परिसराची आवश्यक जतन दुरुस्ती करण्याबाबत**

**(५०) १४७२७ (१९-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमान्य टिळक यांच्या रत्नागिरीतील जन्मस्थळाची दुरवस्था झाली असून येथील ऐतिहासिक वास्तूच्या दुरुस्तीचा सुमारे अडीच कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाला मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०५-११-२०२०) :** (१) ही बाब निदर्शनास आली नाही.

सदर स्मारकाची व परिसराची आवश्यक जतन दुरूस्ती करण्यात आली आहे. हे स्मारक सुस्थितीत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.